# महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**गुरुवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२**

**( सकाळी ०९.०० ते १०.३० वाजेपर्यंत )**

**एक : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते ४)**

**(अ) (१) डॉ. विनय कोरे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वने मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र शासनाने दिनांक १५ डिसेंबर, २०१८ रोजी पश्चिम घाट संवेदनशील क्षेत्र निश्चिती संदर्भातील अहवाल सर्व संबंधित घटक, ग्राम पंचायती, आमदार, खासदार तसेच इतर लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा करून केंद्र शासनाकडे पाठविला असणे, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाने राज्य शासनाकडून प्रस्तावित पर्यावरण संवेदनशील गावांना अनुदान आणि विकासाच्या दृष्टीने कशाप्रकारे राज्य शासन आर्थिक मदत देईल अथवा अधिकच्या सुविधा देईल याबाबतचे स्पष्टीकरण सन २०१८ च्या मूळ प्रस्तावांव्यतिरिक्त देण्याचे सुचित केलेले असणे, दिनांक ७ जून, २०१९ रोजी तत्कालीन केंद्रीय पर्यावरण मंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्यामध्ये सन २०१८ च्या प्रस्तावाप्रमाणे महाराष्ट्र पर्यावरण संवेदनशील क्षेत्राची अधिसूचना अंतिम करण्यासंदर्भाने चर्चा झालेली असणे, त्यानुसार अहवाल तयार करावयाचा असूनही सन २०२१ मध्ये तत्कालीन शासनाने ग्रामपंचायती अथवा प्रस्तावित क्षेत्रातील लोकप्रतिनिधी यांच्याशी कसलीही चर्चा न करता तसेच यासंदर्भात पूर्वी राज्य शासनामार्फत केलेली प्रक्रिया विचारात न घेता आणि केंद्र शासनाने अपेक्षित केलेले अनुदान अथवा विकास कामासंदर्भातील सुविधा यावर कसलेही प्रस्ताव न देता अधिकची गावे अन्यायकारकरीत्या समाविष्ट करून परस्पर अहवाल सन २०२१ मध्ये पर्यावरण मंत्रालयास पाठविलेला असणे, सदरचा अहवाल राज्याच्या विकासाच्या दृष्टीने बाधक असून तातडीने स्थगिती करणे गरजेचे असणे, पर्यावरण मंत्रालयाने दिलेल्या सूचनेनुसार पर्यावरण संवेदनशील क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यासाठी प्रस्तावित

विधानमंडळ असुधारित प्रत

असलेल्या गावांना सुविधा व अनुदान देण्यासाठीची प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे असणे, जरूर तर राज्य शासनाच्या स्तरावर सन २०१८ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने स्थानिक सदस्य आणि लोकप्रतिनिधी यांच्यासह तज्ज्ञांची समिती नेमणे बाबत आणि पश्चिम घाट क्षेत्रातील पर्यावरणाचे संरक्षण करत असतानाच प्रस्तावित ग्रामपंचायतींना विकासाची जास्तीत जास्त संधी मिळावी याबाबत शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

**(२) श्री.अबू आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे पर्यावरण व वातावरणीय मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई स्थित असलेल्या एम-पूर्व विभागात एस. एम. एस. एनवोक्लीन नामक रासायनिक कंपनीमुळे मानखुर्द—शिवाजीनगर विभागात मोठ्या प्रदूषणात दिवसेंदिवस प्रचंड वाढ होणे, वेळोवेळी सदनामध्ये सदर कंपनी बंद करण्यात यावी यासाठी प्रश्न उपस्थित केला असता सदर कंपनी लवकरात लवकर स्थलांतरित करण्यात येणार असल्याचे मा. पर्यावरण मंत्री यांनी आश्वासित करूनही अद्यापपर्यंत कंपनी बंद करण्यात आली नसणे, कंपनीचे स्थलांतरण करण्याबाबत कोणतेही पाऊल उचलले गेले नसणे, कंपनी बंद करण्याबाबत वेळोवेळी धरणे, आंदोलने स्थानिक नागरिक, सेवाभावी संस्था, लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत करण्यात आले असून संबंधित विभागांना सुद्धा कंपनी बंद करण्याबाबत निवेदन करण्यात येणे, विभागात वाढत असलेल्या प्रदूषणामुळे लोकांच्या आरोग्याला धोका होत असून सदर विभागातील सामान्य नागरिकांचे आयुष्यमान हे ३९ वर्ष असल्याचे एका अहवालातून निदर्शनास येणे, सदर कंपनीच्या विरोधात दिनांक २७ जुलै, २०१९ वा त्यासुमारास आंदोलन केले असता आंदोलन करणाऱ्या लोकप्रतिनिधींना तुरुंगात टाकणे, सदर घटनांमुळे जनसामान्यांमध्ये वाढत चाललेली असंतोषाची भावना, सदर बाबतीत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) श्री. झीशान सिद्दिकी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनाचे अनेक अधिकारी कर्मचारी गेली अनेक वर्षापासून वांद्रे शासकीय वसाहतीत राहत असणे, मुंबईत अनधिकृत झोपडपट्टीधारकांना देखील हक्काचे घर दिले जाणे, तथापि, शासनाची सन २००५ पासून अनेक वर्षे सेवा करणाऱ्या या अधिकारी/कर्मचाऱ्यांना हक्काचे घराकरीता बांद्रा पूर्व येथे त्याच ठिकाणी जागा देण्याबाबत शासनाने निर्णय घेतल्यानंतरही शासनाने त्याबाबत अद्यापही कोणतीही कार्यवाही न करणे, त्यामुळे शासकीय निवासस्थानात अधिकारी/कर्मचाऱ्यांना हक्काचे घर मिळावे ही अनेक वर्षांची मागणी अद्याप प्रलंबित राहणे, शासकीय

कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या वेतनातून देखभाल दुरुस्ती खर्च कापण्यात येत असतानाही सन २००५ पासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून या वसाहतीची देखभाल दुरूस्तीची कामे बंद असणे, तथापि काही सदनिका / इमारती धोकादायक असणे, त्या बळजबरीने रिक्त करण्याकरीता विश्वासहर्ता नसलेल्या कंपन्यांकडून स्ट्रक्चरल ऑडिट विभागाने मनासारखा अहवाल बनवून संदर्भ देणे, हा अहवाल साशंक वाटल्याने LNT सारख्या नामांकित कंपनीकडून इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची रहिवाशांची मागणी असतानाही ती मागणी फक्त प्रस्तावित ठेवत गत तीन वर्षापासून या नोटीस दिलेल्या इमारतींवर व सदनिकांवर दुरुस्तीपोटी शासनाने एक रुपयाही खर्च न करणे, इमारतीची जाणीवपूर्वक दुर्दशा करुन रहिवाशांच्या जीवाशी खेळणे, स्ट्रक्चरल ऑडिट नावाजलेल्या कंपनीकडून केले आहे का ? असल्यास कंपनी कोणती आहे ? अहवालाबाबत रहिवासी अधिकारी / कर्मचाऱ्यांनी कोणतीही माहिती न देणे, सध्या सदनिका रिक्त करण्याच्या नोटीसा येत असल्याने रहिवासी स्थलांतरित होण्याकरिता तयार असल्यास काही दिवसांनी स्थलांतरित झालेल्या इमारती देखील धोकादायक असल्याचे अहवालात नमूद असतानाही अशा इमारती धोकादायक ठरवून पुन्हा इतर ठिकाणी स्थलांतरित केले जाणार नाही याबाबत खात्री विभाग देत नसणे व याबाबत विभागाकडे निश्चित धोरण नसणे, त्यामुळे रहिवाशी हवालदिल होणे, इमारती धोकादायक झाल्याने रहिवाशांची ईच्छा नसताना त्यांना स्थलांतरित करणार असल्यास त्याकरिता निधी / अनुदानाची कोणतीही तरतूद केली नसतानाही स्थलांतर करण्याची बळजबरी करणे, संक्रमण शिबिर म्हणून वांद्रे वसाहतीमधील रिक्त सदनिकेत अथवा नवीन बांधकाम सुरू असलेल्या जागेत स्थलांतरित करणार याबाबत स्पष्टता नसणे, सुधारित वाटप आदेश दिल्यानंतर स्थलांतरित होण्याच्या सदनिकेच्या दुरूस्तीचे कामकाज करून नंतर स्थलांतरित होण्यास पुरेसा अवधी देण्याकरीता नागरीकांच्या विनंतीकडे दुर्लक्ष करणे, तसेच नवीन उभारण्यात येणाऱ्या शासकीय निवासस्थानात चतुर्थश्रेणीच्या वेतनश्रेणीनुसार फक्त त्यांच्याकरीताच सदनिका बांधण्यात येणे, वर्ग दोन व वर्ग तीन करीता सदनिका बांधणेबाबत कोणताही निर्णय अद्यापही न होणे, त्यामुळे कमी क्षेत्रफळाच्या सदनिकेत जाण्याकरीता रहिवाशांचा असलेला विरोध, वसाहतीतील पर्यायी ज्या इमारती धोकादायक नाहीत फक्त अशा रिक्त सदनिका संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना उपलब्ध करून देण्याबाबत अधिकारी/कर्मचारी यांची आग्रहाची मागणी, वारंवार स्थलांतर करण्यास रहिवाशांमध्ये असलेला विरोध, असंतोष, यामुळे शासकीय वसाहतीतील अधिकारी/कर्मचारी यांच्यामध्ये निर्माण झालेला संभ्रम, याकरीता शासकीय वसाहतीतील धोकादायक इमारतींमधील नोटीस प्राप्त अधिकारी/कर्मचारी यांनी मागणी केल्याप्रमाणे LNT सारख्या नामांकित कंपनीकडून पुन्हा स्ट्रक्चरल ऑडीट करणे, तो पर्यंत पर्यायी व्यवस्था होत नाही

विधानसभा अप्रकाशित प्रत

तोपर्यंत या इमारतींची तात्पुरती दुरुस्ती करुन इमारती अधिक मजबुत होवून रहिवाशांना राहण्यायोग्य करुन देण्याची नितांत आवश्यकता व स्थलांतरणाबाबतच्या शासकीय वसाहतीतच रहिवाशांना हक्काची घरे देण्याकरीता पर्यायी जागा देण्याबाबतच्या धोरणाची स्पष्टता, वस्तुस्थिती रहिवाशांना कळविण्याची आवश्यकता, त्यामुळे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया.”

**(४) श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“राज्यातील २३ जिल्ह्यातील १२५ अति मागास तालुक्यात मानव विकास मिशनचा कार्यक्रम राबविला जात असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, यामध्ये नंदुरबार, गडचिरोली, जालना, वाशिम, नांदेड, हिंगोली, परभणी, बुलढाणा आणि धुळे हे नऊ जिल्हे प्रामुख्याने अत्यंत मागासलेले असल्याचे मानव विकास मिशनने स्पष्ट करणे, मागास निर्देशांक ठरवताना शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या तीन बाबीवर मानव विकास निर्देशांक ठरविण्यात येत असणे, हा निर्देशांक ठरविताना या ठिकाणच्या व्यक्तींचे दरडोई उत्पन्न किती आहे याचाही उल्लेख असतो मात्र या नऊ जिल्ह्यांतील दरडोई उत्पन्नात व शिक्षण, आरोग्य, रोजगार या तीनही बाबींमध्ये अद्यापही सुधारणा झालेली नसणे, त्यामुळे परभणी जिल्हा हा अतिशय मागास जिल्हा म्हणून गणला जात असून मानव विकास निर्देशांकात सुधारणा करण्यासाठी शासनाने वेळीच उपाय योजना करण्याची आवश्यकता असणे, त्यामुळे येथील सर्वसामान्य जनता व नागरिकांमध्ये असलेली नाराजी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

**(५) सर्वश्री.रईस शेख, अबू आजमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे अल्पसंख्यांक विकास मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“अल्पसंख्यांक विकास विभागाच्या सन २०२१ -२२ या आर्थिक वर्षात राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांसाठी मंजूर निधी पैकी मोठ्या प्रमाणात निधी खर्च न झाल्याची बाब ११ ऑगस्ट २०२२ रोजी उघड होणे, विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या जवळपास ३१ योजनांपैकी अनेक योजनांमध्ये लाभार्थ्यांना योग्य लाभ न देण्यात येणे, अल्पसंख्यांक विभागाच्या अधिपत्याखालील १) महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी २) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ ३) महाराष्ट्र राज्य पंजाबी साहित्य अकादमी ४) महाराष्ट्र राज्य हज समिती ५) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग ६) महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण ७) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ व ८)

विधानसभा अग्रिम प्रत

खुद्द मंत्रालय या कार्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने योजना राबवण्यासाठी विभाग सक्षम नसणे, बऱ्याच कार्यालयांमध्ये योजनांच्या अंमलबजावणी यंत्रणांअभावी लाभार्थी निवड न होणे, तसेच शासनाच्या विविध विभागांशी वेळेत समन्वय साधु न शकणे त्यामुळे मागणी अभावी काही योजनांकरिताचा ०% निधी खर्च होणे, त्यामुळे अल्पसंख्याक समाजात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून त्यावर शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(६) डॉ.राजेंद्र शिंगणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सांस्कृतिक कार्य मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"बुलढाणा जिल्हयातील मातृतिर्थ सिंदखेडराजा शहराला ऐतिहासिक वारसा लाभलेला असून सिंदखेड राजा हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोळ व राजमाता जिजाऊ आईसाहेब यांचे जन्मस्थळ असणे, जिजाऊ नगरीत ऐतिहासिक वास्तुंपैकी सुमारे ५००-६०० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या प्रसिध्द चांदणी तलावाची भिंत १ एप्रिल, २०२२ मध्ये पडली असून त्याकडे पुरातत्व विभागाचे झालेले दुर्लक्ष, सिंदखेड राजा शहराचे ग्रामदैवत असलेल्या रामेश्वर मंदिराची भिंत ३ एप्रिल, २०२२ पडलेली असणे, ती भिंत नव्याने बांधण्याची आवश्यकता, आईसाहेब जिजाऊ जन्मस्थळ असलेल्या जिजाऊ राजवाडयात नियमित रोषणाई करुन राजवाडयासमोर पर्यटकांच्या वाहनांसाठी वाहनतळ निर्माण करण्याची तसेच इतर सोयीसुविधा करण्याची आवश्यकता, राजे लाखोजीराजे जाधव यांच्या समाधीकरिता वापरण्यात आलेला दगड जीर्ण होत असून त्यावर योग्य ती रासायनिक प्रक्रिया करण्याची व या परिसराचे सुशोभिकरण करण्याची आवश्यकता, तसेचं सावकार वाडयाचा विकास करणे, रेणुका माता मंदिर, निळकंठेश्वर मंदिर व बालाजी मंदिरांचा जीर्णोद्वार करणे, पुतळा बारव व परिसराचे सुशोभिकरण करणे, तसेच या परिसरात असलेल्या २२ तलावांचा शोध घेऊन त्यांचे उत्खनन करुन त्यातील पाण्याचा परिसरातील शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी उपयोग करण्याची आवश्यकता, मोती तलावाच्या भिंतीवर मोठया प्रमाणात वाढलेली काटेरी झुडपे समूळ नष्ट करण्यासाठी त्यांच्यावर रासायनिक प्रक्रिया करुन तलाव परिसरात रोषणाई करणे व परिसरात सुगंधित झाडे लावण्याची तेथील जनतेची होत असलेली मागणी, या वास्तुंकडे वेळीच लक्ष न दिल्यास त्या नष्ट होण्याची पर्यटक व नागरिकांमध्ये भिती निर्माण होणे, सिंदखेड राजा नगरीत असलेल्या सर्व पुरातत्व वास्तुंकडे पुरातत्व विभागाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्षामुळे या भागातील नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

विधानसभा अग्रिम प्रत

**(७) श्री.सिध्दार्थ शिरोळे, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री. सुनिल कांबळे, भिमराव तापकीर, ॲड. राहूल कुल, सर्वश्री.सुनिल टिंगरे, चेतन तुपे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"शिवाजीनगर (जि.पुणे) विद्यापीठ रोड येथे हिंजवडी–शिवाजीनगर मेट्रोमार्गावर उड्डाणपूल बांधण्यासाठी पीएमआरडीए ने काम हाती घेणे, सन २०२० मध्ये तेथील उड्डाणपूल हा सदर कामाकरिता पाडण्यात येणे, परंतु नवीन उड्डाणपूलाचे काम अतिशय संथ गतीने चालू असणे, यामुळे त्याठिकाणी दररोज वाहतूक कोंडी होत असून या वाहतूक कोंडीचा नागरिकांना प्रचंड त्रास होत असणे, हा चौक पुणे शहराच्या उपनगरांना जोडणारा अत्यंत महत्वाचा वाहतूक मार्ग असणे, येथील वाहतूक सुरळीत करण्यासाठी केवळ याच चौकाचा विचार न करता गर्दीच्या वेळी ब्रेमेन चौक, पाषाण चौक, बाणेर चौक येथपर्यंत नियोजन करणे आवश्यक असणे, वाहतूक पोलिसांनी या मार्गावर सकाळी ९ ते १२ आणि सायंकाळी ५ ते ९ या कालावधीत वाहतूक नियमन दोन ते तीन किलोमीटर आधीपासून करण्याची आवश्यकता असणे, या मेट्रो मार्गावर वाहतुकीसाठी पर्यायी मार्गांचा विचार होणे गरजेचे असणे, शासनाने उड्डाणपुलाचे काम जलदगतीने सुरु करून किमान दोन वर्षाचे वाहतूकीचे सूक्ष्म नियोजन (Micro Management) व पर्यायी मार्गांचा विचार तातडीने करण्याची गरज, त्या दृष्टीने शासनाने गांभीर्याने व तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) ॲड. राहूल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"पुणे जिल्ह्यातील जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेची प्रकल्पीय सिंचन क्षमता १३८३५ हे. तर पुरंदर उपसा सिंचन योजनेचे प्रकल्पीय सिंचन क्षमता २५७५३ हेक्टर इतके असणे, दौंड, पुरंदर आणि बारामती तालुक्यातील कायमस्वरूपी दुष्काळी भागातील पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याच्या उद्देशाने कोट्यवधी रुपये खर्च करून पुरंदर उपसा सिंचन व जनाई-शिरसाई सिंचन योजना कार्यान्वित करण्यात आली असणे, जनाई शिरसाई योजनेसाठी ३.६० टीएमसी तर पुरंदर उपसा सिंचन योजनेसाठी ४ टीएमसी पाणी राखीव करण्यात येऊन देखील पूर्ण क्षमतेने पाणी पुरवठा केला जात नसून, योजना सुरू होऊन पूर्ण क्षमतेने चालू नसणे, योजनेसाठी करण्यात आलेल्या पाईपलाईनला मोठ्या प्रमाणावर गळती असणे, दौंडच्या दक्षिणेकडील भागातील अनेक गावे अद्यापही या पाण्यापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास आले असणे. सरकारचा उदासीनपणा व नियोजनाच्या अभावी योजना कुचकामी ठरत असणे. दौंड तालुक्यातील खोर, पडवी, देऊळगाव गाडा, कुसेगाव, वासुंदे, हिंगणीगाडा, रोटी, जिरेगाव व पांढरेवाडी या गावांचा समावेश जनाई शिरसाई व पुरंदर उपसा सिंचन योजनेत

विधानसभा असुधारित प्रत

करण्यात आला असणे, जलसंपदा विभागाने यापूर्वी तयार करून दिलेले पाझर तलाव, लघु पाटबंधारे तलाव यांची संख्या कमी असल्याने, त्या गावामधील काही समाविष्ट परंतु भरता न येणारे तलाव, समाविष्ट व भरता येणारे तलाव व नव्याने समाविष्ट करण्याचे तलावाचे फेर सर्वेक्षण करण्याची मागणी मा. लोकप्रतिनिधीनी दि. १० जानेवारी २०२२ रोजी वा त्यापूर्वी देखील वारंवार केली असणे, तसेच बैठकांमध्ये देखील केली असणे, मा. उपमुख्यमंत्री यांना देखील याबाबत दि.१७.०६.२०२२ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला असणे पुरंदर उपसा सिंचन योजनेतील दौंड तालुक्यातील खुपटेवाडी फाटा येथील तांत्रिक अडचणी दूर करणे व जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेतील तलावांना जोडणाऱ्या जोडकालव्यांची अपूर्ण कामे पूर्ण करणे, लाळगेवाडी व पडवी, येथील गायकवाडवस्ती तलाव जोड कालवा यांची कामे करणे, खोर, ता. दौंड येथील डोंबेवाडी तलावात बंद नळीतुन पाणीपुरवठा करणे आदी कामे मागील अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याने नागरिकांना पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत असणे, यामुळे नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपयोजना.”

**(९) कॅप्टन आर. तमिल सेल्वन, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“मुंबईतील सायन कोळीवाडा विभागात ७५ टक्क्यांपेक्षा अधिक क्षेत्र हे झोपडपट्टीने व्यापलेला असून यामध्ये बहुतांश झोपडपट्ट्यांचा पुर्नविकास करण्यासाठीचे प्रकल्प मागील १५ ते २० वर्षांपासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास येणे; सदर विभागात विकासकांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प हाती घेऊन झोपड्यांचे निष्कासन करण्यात येणे; परंतु सदर झोपडी धारकांना कुठल्याच प्रकारचे संक्रमण शिबीर किंवा भाडे देण्यात न येणे; परिणामी बहुतांश गरीब व मध्यम वर्गीय वर्गातील झोपडीधारक रस्त्यावर आले असून त्यांच्या डोक्यावरील छत्र विकासकाकडून हिरावून घेण्यात येणे; झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबवित असताना प्रथम पुनर्वसन इमारत बांधणे बंधनकारक असतानाही विकासकाने खासगी विक्रीकरीता घरांची निर्मिती करून त्यांची विक्री सुरू करण्यात आल्याचे निदर्शनास येणे; सदर पुनर्वसन प्रकल्प उभारण्याकरिता लागणाऱ्या सर्व प्रकिया पूर्ण झाल्या असतानाही विकासकाकडून प्रकल्प उभारण्यासाठी जाणीवपूर्वक दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास येणे; परिणामी विभागातील रहिवाश्यांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष; सायन कोळीवाडा विभागातील रखडलेले पुनर्वसन प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करून रस्त्यावर आलेल्या झोपडीधारकांना हक्काची घरे मिळवून देण्याची नितांत आवश्यकता; याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”

**(१०) श्री.सचिन कल्याणशेट्टी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे**

विधानसभा असुधारित प्रत

**उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे हद्दीत गेल्या कित्येक वर्षापासून दुधनी येथे असलेल्या शांभवी लॉजींग,फुटी ऑर्केस्ट्रा व बालाजी चित्र मंदिर (थिएटर) इमारती मध्ये अवैध धंदे सर्रासपणे सुरू असल्याची बाब जुलै, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशन ने स्थानिक प्रशासनाचे वीज वितरण व जिल्हाधिकारी कार्यालय यांना कारवाईसाठी अहवाल २२/०२/२०२२ रोजी सादर केल्याची बाब निदर्शनास येणे, तरीही सदर स्थानिक प्रशासन दबावाखाली येऊन कोणतीही कार्यवाही करत नसल्याची बाब समोर येणे, त्यामुळे तेथे जुगार सारखे अवैध धंदे सुरू असणे, सोलापूर अधीक्षक यांच्या पथकाने वारंवार यावर कारवाई करणे,परंतु कारवाई झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी सदरहू धंदे पुन्हा सुरू असणे, परिणामी विभागातील रहिवाशांना शासनाप्रति पसरलेला असंतोष, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाय योजना."

**(११) श्री.अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"मुंबई महापालिकेने सन २०१४ मध्ये मागविलेल्या अर्जाला ९९ हजार फेरीवाल्यांनी अर्ज केला असणे, यासाठी नियुक्त समितीमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश करण्याबाबत राज्य सरकारकडे अभिप्राय मागण्यात आला असणे, मात्र मुंबईत प्रत्यक्षात दोन लाखांहुन अधिक फेरीवाले असणे, तरी यापैकी केवळ १५ हजार ३६१ पात्र फेरीवाल्यांना प्रमाणपत्र देण्यास मान्यता दिली असणे, फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्यासाठी केंद्र शासनाने १ मे, २०१४ रोजी पथविक्रेता अधिनियम, २०१४ प्रसिध्द केले असणे, त्यानुसार राज्य शासनाने महाराष्ट्र पथ विक्रेता नियम २०१६, पथविक्रेता महाराष्ट्र योजना २०१७ प्रसिध्द केली असणे, पालिकेने फेरीवाल्यांची पहिली पात्रता यादी जाहीर करीत फेरीवाला क्षेत्रही तयार केले असणे, हे धोरण अंमलात आणण्यासाठी नियुक्त फेरीवाला समितीत नगरसेवक, लोकप्रतिनिधींचा समावेश करण्याचा ठराव महासभेत मंजूर करीत अभिप्रायासाठी राज्य सरकारकडे पाठविला असणे, परंतु त्यावर अद्यापर्यंत उत्तर आले नसणे, त्यामुळे अभिप्राय आल्यानंतरच अधिनियमांची अंमलबजावणी करुन पथविक्रेत्यांना प्रमाणपत्र देण्यात येतील असे प्रशासनाने स्पष्ट केले असणे, मा न्यायालयाच्या निर्देशानुसार लोकसंख्येच्या दोन टक्के फेरीवाल्यांना परवानगी असणे, यानुसार मुंबईत दोन लाख फेरीवाल्यांचे पुनर्वसन होऊ शकत असणे, मात्र विभाग कार्यालयामार्फत आलेल्या हरकती-सूचनांनुसार मुंबईतील ४०४ रस्त्यांवर ३० हजार ८३२ ओटे निश्चित करण्यात आले असणे, फेरीवाल्यांचे पुनर्वसन करण्याबाबत तसेच फेरीवाला धोरण लवकरात लवकर ठरविण्याबाबत शासनाने उपाययोजना करण्याबाबत तसेच शासनाने करावयाची कार्यवाही

विधानसभा असुधारित प्रत

व शासनाची प्रतिक्रिया.”

**(१२) श्री. सुनिल प्रभु, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई पश्चिम उपनगरातील मालाड पूर्व पश्चिम द्रुतगती मार्गावरील पठाणवाडी येथील जागृती बस आगारासमोरील झोपडपट्टी व सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारती लगत असलेली सन २००५ मध्ये रस्ता रुंदीकरणासाठी तोडण्यात आलेली संरक्षण भिंत एमएमआरडीए प्राधिकरणाने आश्वासन देऊनही अद्याप पूर्ववत बांधून दिली नसल्याचा प्रकार दि.२२.०८.२०२२ रोजी निदर्शनास येणे, सदरहू संरक्षक भिंत तोडल्यामुळे येथील संपूर्ण भाग खुला झाला असल्याने सदरहू भागात नागरीकांची रहदारी व वर्दळ वाढली असल्याने त्याचा लगतच्या झोपडपट्टीधारक रहिवाशी कुटुंबे आणि सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीमधील रहिवाशी कुटुंबांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, सदरहू ठिकाणी असलेली संरक्षक भिंत एमएमआरडीए प्राधिकरणाने सन २००५ साली पाडली असून अद्याप पर्यंत १७ वर्षे इतका प्रदिर्घ कालावधी होऊनही आणि या संदर्भात बाधित झोपडपट्टी रहिवाशी संघ आणि सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी प्राधिकरणास अनेक वेळा लेखी निवेदन देऊनही अद्याप त्याची दखल घेण्यात न येणे, सदर ठिकाणी पूर्ववत संरक्षक भिंतीचे बांधकाम करण्याकडे प्राधिकरणाचे व शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी तेथील स्थानिक रहिवाशी कुटुंबामध्ये निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(१३) श्री.कैलास घाडगे-पाटील, बाळासाहेब आजबे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प हा उस्मानाबाद व बीड जिल्हयातील अवर्षण प्रमाण दुष्काळी भागातील जनतेसाठी वरदान ठरणारा एक महत्वाकांक्षी प्रकल्प असतांना प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेला देण्यात आलेली स्थगिती,या प्रकल्पांतर्गत मराठवाडयातील उस्मानाबाद जिल्हयातील कायम दुष्काळी आठ तालुक्यातील ९० गावांमधील ८७ हजार १८८ हेक्टर क्षेत्रास व बीड जिल्हयातील आष्टी तालुक्यामधील ४४ गावांमधील २७ हजार ५४३ हेक्टर क्षेत्रास २३.६६ अ.घ.फु पाणी उपलब्ध होऊन गावे सुजलाम सुफलाम होण्यास मदत होणार असणे, सदर प्रकल्पाची कामे सन २००७ पासून सुरु झाली असून अदयापपर्यंत पूर्ण न होणे, उपसा सिंचन योजना क्र.१ मधील कामे सुरु असून सोनगिरी साठवण तलावाच्या टप्पापर्यंत कामे प्रथम टप्पायातील पंपगृह, उध्वगामी नलिका ही कामे अदयापी सुरु नसणे, सदर उर्वरित कामाच्या एकत्रित निविदा प्रसिध्द केलेल्या असून

विधानसभा अतारांकित प्रश्न

सदयस्थितीमध्ये कामांना दिलेली स्थगिती, प्रकल्पाच्या पूर्णत्वाचे अनुषंगाने सदर निविदा रद्द अथवा स्थगिती झाल्यास नव्याने अंदाजपत्रक करणे व त्यास मान्यता देणे यासाठी आणखीन जादा कालावधी लागण्याची शक्यता, कृष्णा मराठवाडा प्रकल्पाबाबत तत्कालिन मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक होऊन प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने आवश्यकती कार्यवाही करण्याबाबत निर्णय घेण्यात येणे, तसेच तत्कालिन जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊनही शासनाने व्दितीय प्राधान्य क्रमातील कामे हाती घेऊन त्यास मंजूरी देण्यात आलेली नसणे, प्रकल्प पूर्णत्वास नेण्यास येत असलेल्या अनेक अडचणी, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने प्राधान्याने लक्ष घालून तातडीने प्रकल्पाचे काम पूर्णत्वास नेण्याकरिता निविदा प्रक्रियेला दिलेली स्थगिती तात्काळ उठविण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रीया व भूमिका.''

**(१४) श्री.सुरेश भोळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"जळगाव शहरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झालेली असणे, रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे नागरिकांना रस्त्यांवर चालणे सुद्धा कठीण झालेले आहे, तसेच शहरातील रस्त्यांवर लहानमोठे अपघात सुद्धा होणे, नागरिक आपला जीव धोक्यात टाकून शहरात वावरत असणे, तसेच शहरातील अनेक भागातील नागरिकांकडून रस्त्यांच्या वारंवार तक्रारींकडे प्राप्त होणे तरीही शासनाचे या तक्रारी दुर्लक्ष होणे, करोडो रुपये खर्च करून सुद्धा रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असणे, सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तसेच नवीन करण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

**(१५) श्री.समीर कुणावार, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

'वर्धा जिल्ह्यात तसेच विदर्भांत अनेक जिल्हयात जुलै, १६, १७, १८ तसेच ऑगस्ट, १२ व १३ ला अतिवृष्टी होणे, अनेक भागात ढगफुटी होणे, २०० ते २५० मी.मी. पाऊस पडणे, त्यामुळे ग्रामीण भागातील शेकडो पुल रस्ते वाहुन जाणे, जागो-जागी रस्ते खचल्यामुळे वाहतुक बंद होणे, अनेक पुल तुटल्यामुळे वाहून गेल्यामुळे बस सेवा बंद होणे, अनेक गावाच्या संपर्क तुटणे, यावर शासनाने उपाययोजना करण्यासाठी अतिवृष्टी भागात रस्ते व पुलासाठी विशेष पॅकेज जाहिर करण्याची आवश्यकता, तसेच पांदण रस्ते पूर्णपणे खचुन जाणे, नदी, नाल्यांनी आपले पात्र बदलविणे, पांदण रस्तेसाठी रोजगार हमी, मातोश्री पांदण योजनेतून विशेष पॅकेज देणे, पांदण रस्ते तातडीने दुरुस्त करण्याची गरज असणे, अतिवृष्टी काळात अनेक विहिरी खचुन जाणे, त्यांच्या पूर्णबांधणीसाठी निधीची

विधानसभा अप्रधारित प्रत

आवश्यकता असणे,अतिवृष्टीमुळे पिकांचे झालेले नुकसान, २०२०-२१ मध्ये वर्धा जिल्हयात नापिकीमुळे झालेल्या ३३% पेक्षा १७८ कोटीची रक्कम जास्त नुकसानीची मदत शासनाकडून अद्याप न मिळणे, त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची व जनतेची तीव्र नाराजी निर्माण झालेली असणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

**(१६) श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"संत शिरोमणी गाडगे महाराज मार्ग (जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्ता) लगत असलेल्या प्रतापनगर हिंदू स्मशानभूमीच्या विकासाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने आवश्यक निधी मंजूर करून या स्मशानभूमीच्या विकासाचे काम सुरु केलेले असणे, सदरहू स्मशानभूमीच्या विकास कामामुळे बाधित झालेल्या जवळपास ८२ झोपडीधारकांपैकी केवळ ४० झोपडीधारकांचे पुनर्वसन अद्याप करण्यात आले असून उर्वरीत ४२ झोपडीधारक अद्याप पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असणे, उक्त ४२ स्थानिक संरक्षित पात्र झोपडीधारकांचे शासनाच्या नियमानुसार पुनर्वसन होणे प्रलंबित असल्याने सदरहू स्मशानभूमीच्या विकासाचे काम अद्याप प्रलंबित राहिलेले असणे, उक्त ४२ झोपडीधारकांचे पुनर्वसन याच परिसरात करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास तसेच माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन सादर केलेले असणे, तथापि सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने आजवर कोणतीच कार्यवाही करण्यात न आल्याने या पुनर्वसन प्रकल्पातील पात्र झोपडीधारक त्यांच्या हक्काच्या सदनिकांपासून वंचित असल्याची बाब निदर्शनास येणे, या प्रकरणी होत असलेल्या विलंबास जबाबदार असणारे संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर तातडीने कारवाई करून बाधितांचे तातडीने पुनर्वसन करण्याची मागणी या प्रकल्पातील बाधित झोपडीधारकांकडून सातत्याने करण्यात येत असूनही त्या प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरणे, सदरहू प्रकरणी बाधित झोपडीधारकांचे तातडीने पुनर्वसन करून प्रतापनगर हिंदू स्मशानभूमीचा तातडीने विकास करण्याच्या अनुषंगाने आवश्यक निधीची उपलब्धता करून सदरहू स्मशानभुमीची पुर्नविकासाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना तसेच याबाबतची शासनाची नेमकी भूमिका."

**(१७) डॉ. राहूल पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

विधानसभा अग्रिम प्रत

"महाराष्ट्र राज्यातील गोर-गरीब रुग्णांसाठी राज्य शासनामार्फत महात्मा ज्योतीबा फुले आरोग्य योजना राबविण्यात येणे, सदर योजनेंतर्गत ९७५ आजारांवर मोफत उपचार मिळत असणे, सदर योजना ॲलोपॅथी उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी वरदान ठरत असणे, आयुर्वेद उपचार पध्दतीमध्ये सर्व आजारांवर औषधोपचार होत असणे, राज्यात सन २०१७ पर्यंत ६९ आयुर्वेद महाविद्यालय सुरु असणे, सदरील महाविद्यालयांतून उत्तीर्ण झालेल्या डॉक्टरांची संख्याही मोठ्या प्रमाणात असणे, त्यामुळे देश पातळीवर तसेच राज्यामध्ये आयुर्वेद उपचार घेणाऱ्यांची रुग्णांच्या संख्येतही मोठ्या प्रमाणात वाढ होत असणे, आयुर्वेद उपचार सर्वसामान्य, गोरगरीब रुग्णांपर्यंत पोहचत असणे, परंतू आयुर्वेद उपचार पध्दतीचा समावेशन शासनाच्या कोणत्याही आरोग्य योजनेमध्ये नसल्यामुळे आयुर्वेद उपचार घेणा-या रुग्णांची होणारी आर्थिक कुचंबना, शासनाने आयुर्वेदीक उपचार महात्मा ज्योतीबा फुले आरोग्य योजनामध्ये समाविष्ठ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची निर्णयात्मक कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**(१८) श्रीमती गीता जैन, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मिरा भाईंदर शहरातील अनेक गृहनिर्माण संस्थांचे मानीव अभिहस्तांतरणाची (डीम्ड कन्व्हेन्स) प्रकिया सुरू असणे सदर सोसायट्यांच्या ७/१२ वर फेरफार करण्याच्या वेळी नागरी जमीन कमाल धारणा, अकृषिक दाखला भोगवटादार वर्ग २, इत्यांदींच्या बोज्यामुळे ७/१२ वरील फेरफाराची प्रक्रिया रोखली जाणे, त्यामुळे गृहनिर्माण संस्थांमधील रहिवाश्यांना त्यांच्या सोसायटीचे मानीव अभिहस्तांतरणाची नोंदणी झाल्यानंतरही ७/१२ वर सोसायटीच्या नावाची नोंद न झाल्यामुळे हक्काच्या घरापासून वंचित रहावे लागणे, महाराष्ट्र राज्यात अनेक ठिकाणी बांधकाम केलेली इमारत भोगवटासाठी योग्य स्थितीत असेल तरच नगरविकास विभागाकडून भोगवटा प्रमाणपत्र दिले जाणे, भोगवटा प्रमाणपत्र असलेल्या गृहनिर्माण संस्थाचे नाव ७/१२ वर नोंदवले जाणे, मिरा भाईंदर शहरातील अनेक गृहनिर्माण सोसायट्या ३०-४० वर्ष जुन्या असल्याकारणाने त्यांच्याकडे भोगवटा प्रमाणपत्र उपलब्ध नसणे, शहरातील प्रमाणपत्र नसलेल्या परंतु जुन्या आणि मोडकळीस आलेल्या गृहनिर्माण संस्थाचा पुनर्विकास करणे सुलभ व्हावे यासाठी या सोसायट्यांची नोंद ७/१२ वर होणे आवश्यक असणे, शहरातील धोकादायक गृहनिर्माण संस्थामध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांना सुरक्षित आणि हक्काचे घर मिळावे, यासाठी शासनाने त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१९) सर्वश्री. चंद्रकांत पाटील, शिरीष चौधरी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुक्ताईनगर (जि.जळगांव) रावेर पंचायत समिती येथील स्वच्छ भारत मिशन अंतर्गत देण्यात येत असलेल्या वैयक्तिक व सार्वजनिक लाभात मोठया प्रमाणात गैरप्रकार झाल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०२२ रोजीच्या सुमारास जळगांव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे करण्यात येणे, यासंदर्भात चौकशी करण्याकरिता जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्रयस्थ समिती नेमण्यात येणे, सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर करण्यात येणे, सदरच्या अहवालानुसार शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, परंतु अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात न आल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**(२०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स. सार्वजनिक तातडीच्या व महत्वाच्या बाबीकडे मत्स्यव्यवसाय मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यातील मच्छीमारांच्या विविध प्रश्नांचा अभ्यास व मत्स्यदुष्काळाचे निकष ठरविण्यासाठी समिती नेमण्याची घोषणा मा. मंत्री, मत्स्यव्यवसाय यांनी फेब्रुवारी २०२० मध्ये विधानमंडळात करणे, त्या अनुषंगाने दि. ९/१२/२०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे प्रधान सचिव (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली असणे, परंतु, सदर समितीचा अहवाल अदयाप शासनाला प्राप्त न होणे, शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या कर्जमाफीच्या धर्तीवर मच्छीमारांना कर्जमाफी देण्याबाबत शासन विचाराधीन असून यासाठी मच्छीमारांचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याची सूचना मा. मुख्यमंत्री यांनी दि. १८ फेब्रुवारी २०२० रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग येथे घेतलेल्या बैठकीत करणे, परंतु अद्याप हे सर्वेक्षण झालेले नसणे, कोकणातील मच्छीमार बांधव हा गेल्या काही वर्षांपासून समुद्रात होणारी सततची वादळे, चक्रीवादळे, कोरोनाचे संकट, मासेमारी बंदी अशा वेगवेगळया संकटामध्ये सापडलेला असताना शासनाकडून मदत होण्याऐवजी हेतूपुरस्सर दुर्लक्ष केले जात असल्याची मच्छीमारांमध्ये निर्माण झालेली भावना, काही वर्षांपासून रखडलेला डिझेल परतावा, घरांखालील जमिनी नावावर करण्यात होत असलेला विलंब, मच्छीमारांच्या मुलांना त्यांच्या व्यवसायानुरूप शिक्षण घेण्यासाठी स्वतंत्र मत्स्य विद्यापीठाची सतत मागणी होत असताना किंबहुना दि. ९ जुलै २०१८ रोजी तत्कालिन मंत्री, मत्स्यव्यवयाय यांनी अधिवेशनकाळात सभागृहामध्ये आश्वासन देवूनही सदर विद्यापीठ स्थापन करण्याबाबत कोणतीही कार्यवाही न होणे, समुद्रात अपघाती मृत्यू होवूनही मच्छीमारांच्या कुटुंबाला तातडीने मदत न होणे, मदत मिळविण्यासाठीची किचकट व गुंतागुंतीची प्रक्रिया, त्यामध्ये असलेल्या अनेक अटी शर्ती यामुळे अनेक मच्छीमार कुटुंबे मदतीपासून वंचित राहणे, समुद्रामध्ये बोटीचा अपघात

विधानसभा असुधारित प्रत

होवून दुर्घटना घडल्यास त्याचा तपास जलदगतीने न होणे अशा अनेक विवंचनेत आणि आर्थिकदृष्ट्या मेटाकुटीला आलेल्या मच्छीमार समाजाला विविध मार्गाने आधार देण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.”

**(२१) सर्वश्री. अभिमन्यु पवार, राणाजगजीतसिंह पाटील, श्रीमती नमिता मुंदडा, सर्वश्री. ज्ञानराज चौगुले, छगन भुजबळ, अजित पवार, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, धनंजय मुंडे, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. राजन साळवी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

“महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांसाठी केंद्र शासनाने सुरू केलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (PM KISAN) या योजनेच्या कामकाजावर तहसिलदार व नायब तहसिलदार संघटना, महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र राज्य तलाठी संघ यांनी सन २०२१ मध्ये बहिष्कार घातला असणे, सदरील योजनेतील अनेक शेतकऱ्यांच्या त्रुटीची पूर्तता होत नसल्याने शेतकरी या योजनेच्या मंजुरीपासून तसेच नियमित मिळत असलेल्या मदतीपासून वंचित राहत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, सदर योजनेचे महसूल विभागाच्या पातळीवरील १००% कामकाज पूर्ण झाल्याने सदरील योजना तांत्रिक अडचणी संदर्भात कामे व योजना राबविण्याबाबतची कार्यवाही कृषी विभागाने करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य तलाठी व पटवारी मंडळ यांनी मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये निवेदनाद्वारे केली असणे, कृषी मंत्री महोदय यांनी सदरील योजना कृषी विभागामार्फत राबवली जाईल अशी घोषणा केली असणे, महसूल विभागाने सदरील कामकाजावर बहिष्कार घातला असल्याने साईट बंद असल्याने शेतकऱ्यांची त्रुटी पूर्तता होत नसल्याने तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यात मदत जमा होत नसल्याने शेतकरी तहसील कार्यालयात खेटे मारत असणे, कृषी मंत्री महोदय यांनी २५ मार्च, ते ३१ मार्च, २०२२ या कालावधीत डाटा दुरूस्ती, केवायसी करणे, प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढणे तसेच पात्र असलेल्या शेतकऱ्यांचे अर्ज भरून घेणे यासाठी राज्यात कृषी, महसूल, ग्रामविकास विभागाच्या वतीने ग्राम पातळीवर मोहीम राबविण्याचे आदेश निर्गमित केले असणे, सदरील मोहिमेत भाग न घेता पीएम किसान योजनेचे कामकाज महसूल व ग्रामविकास विभागाने नाकारले असणे,त्यामुळे सदरील मोहीम अयशस्वी झाली असणे, राज्यातील ग्रामीण भागातील हजारो शेतकरी या योजनेपासून वंचित असणे, नगरपालिका, महानगरपालिका व नगरपंचायत मधील रहिवाशी शेतकरी यांचा समावेश या योजनेत दिसून येत नसल्याने सदरील नगरपरिषद हद्दीतील शेतकरी या योजनेपासून वंचित असणे, योजनेच्या अमलबजावणीत राज्य शासनाची उदासिनता दिसून येत असल्याने शेतकरी वर्गात तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण झाली असणे, सदरील योजना सक्षमपणे

विधानसभा अनुद्नित प्रत

राबविण्यासाठी संगायो इंगायो योजनेप्रमाणे या योजनेसाठी राज्य शासनाने पूर्णवेळ अधिकारी व कर्मचारी नियुक्त करून सदरील योजनेत राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा समावेश करण्याबाबत व त्यांच्या त्रुटीची पूर्तता करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”

**(२२) श्री.हसन मुश्रीफ, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"सन २०१९-२० या कालावधीत कोरोना या संसर्गजन्य आजारामुळे शासनाने वेळोवेळी टाळेबंदी जाहीर केलेली असणे, परिणामी या वर्षात कोल्हापूर जिल्ह्यातील बऱ्याच शेतकऱ्यांना पिक कर्जाची उचल करता आलेली नसणे, या शेतकऱ्यांनी कर्जाची उचल एप्रिल, २०२० ते ३० जून, २०२० मध्ये केलेली असणे, कोरोना आजारामुळे ९२,०८८ शेतकऱ्यांनी २०१९-२०२० या वर्षात उचल केली नसल्यास हे शेतकरी महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजना २०१९ या लाभापासून वंचित राहीलेले असणे, या योजनेसाठी सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० हा कालावधी शासनाने विचारात घेतलेला असणे, या ३ आर्थिक वर्षापैकी कोणत्याही २ आर्थिक वर्षात पिक कर्जाची उचल करुन नियमित परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणे, ज्या शेतकऱ्यांनी या ३ वर्षापैकी एकच वर्ष पीक कर्जाची उचल करुन परतफेड केली आहे, असे शेतकरी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहीलेले असणे, अशा शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्याबाबत मा. उपमुख्यमंत्री यांना दि. २०/०८/२०२२ रोजी लोकप्रतिनिधींनी निवेदन देऊन विनंती केलेली असणे, वंचित राहीलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

**(२३) श्री.सुनील राणे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई उपनगरातील मौजे गोराई, ता. बोरिवली (प) येथील स.नं. ४६, ५३, ५४, ५६, ५७, ५९ न.भू.क्र. ४९, १, २, ५९, ८५, ८८, ९८, ९९, १८६९, व १९६० क्षेत्र ५२.१३.४२ हे.आर. (१२८.३३ एकर) स.न. २६७ पै व २७१ पै. न.भू.क्र. १८६९ व १९६० क्षेत्र १०६.०५.५९ हे.आर. (२६२.०७ एकर) येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) यांना मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, यांनी फेरफार क्र. २१५९ व फेरफार क्र. १६१५ दि. २७/०४/२००४ भाडे पट्याने देणे मंजूर केलेले असणे, सदरहू जमिनींचे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांनी दि. २९/१०/२०२१ रोजीचे पत्रान्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि. २८/०८/२०१६ रोजीच्या आदेशानुसार मौजे गोराई येथील काही सर्वे नंबरची मोजणी जून २०१७ मध्ये व हद्द कायम सन २०१८ मध्ये केलेली असणे, सदरहू शासकीय जमिनीवर समाजकंटकांनी जागा बळकावून त्या जमिनी लोकांना विकून

विधानसभा अप्रकाशित प्रत

त्यांची फसवणूक केल्याबाबत स्थानिक पोलीस ठाणेंमध्ये अनेक गुन्हे दाखल केलेले असणे, परंतु आजमितीस सदरहू जमिनींवर दिवसेंदिवस मोठ्याप्रमाणावर अतिक्रमण व खरेदी विक्री होत असून, मौजे गोराई येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे (MTDC) वर्षोनुवर्षे अक्षम्य दुर्लक्ष झालेले असून सदर भूखंडाबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) विभागामार्फत पर्यटन विकासासंदर्भात कोणतेही ठोस निर्णय घेण्यात आलेले नसणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदरहू भाडेपट्ट्यावर दिलेले भूखंड संरक्षित करणेबाबत दि. ३०/१२/२०२१ रोजी बैठक घेऊन तसेच दिनांक २०/०७/२०२२ रोजी मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना महाराष्ट्र पर्यटन विकास, मौजे गोराई, ता. बोरिवली यांना दिलेले शासकीय भूखंड तात्काळ ताब्यात घेणेबाबत निवेदनात्मक मागणी केलेली असणे, शासनाने मौजे गोराई, ता. बोरिवली येथील भाडेपट्ट्यावर दिलेले भूखंड तात्काळ ताब्यात घेण्याबाबत तातडीने निर्णयात्मक कारवाई करण्याची आवश्यकता वा याबाबत शासनाची प्रतिक्रीया."

**(ब) लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) संबंधित निवेदने सभागृहासमोर ठेवणे :-**

(या लक्षवेधी सूचनांची सूची जोडपत्राद्वारे वेगळी वितरीत करण्यात येईल.)

**दोन : अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :**

**सर्वश्री अजित पवार, जयंत पाटील, धनंजय मुंडे, बाळासाहेब थोरात, अजय चौधरी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :-**

"अमरावती जिल्ह्यात मेळघाट हा अतिदुर्गम आदिवासी पट्टा असणे, मेळघाटामध्ये अद्यापही मुलभुत सोई सुविधांचा अभाव असून दिनांक १५ जुलै ते १५ ऑगस्ट, २०२२ दरम्यानच्या एका महिन्यात १८ मुलांचा कुपोषणाने मृत्यु झालेला असणे, याबाबत मा. उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केलेली असून शासनाने त्वरीत कार्यवाही करण्याची सुचना केलेली असणे, या भागात पदस्थापना दिलेले ५० टक्के डॉक्टर कमी मानधन मिळत असल्यामुळे कामावरच येत नसणे, स्त्रीरोग तज्ञ व बालरोग तज्ञ गेल्या ६ महिन्यापासून मेळघाटामध्ये आलेले नसणे, डॉक्टरांच्या निवासाच्या समस्या हे प्रमुख कारण असणे, मात्र आरोग्य विभागातील समन्वयाचा अभाव ही मुख्य समस्या असणे, मेळघाटमधील आरोग्य सुविधांविषयी उच्च न्यायालयात अनेक याचिका प्रलंबित असणे, या याचिकांमध्ये मेळघाट भागातील बालके आणि गरोदर मातांसाठी तज्ञ, पोषण आणि आरोग्य सुविधांची मागणी केलेली असणे, या ठिकाणी बरेचसे मृत्यु पाण्याशी संबंधित समस्यांमुळे झाल्याचे दिसून येत असणे, पिण्यायोग्य पाणी उपलब्ध होत नसल्याचे स्थानिक नागरीकांच्या भेटीअंती दिसून येणे, एकूणच आदिवासींच्या मदतीसाठी तातडीने काय उपाययोजना करता येतील याबाबत मा. उच्च न्यायालयाने निर्देश दिलेले असणे, अल्पमुदतीच्या योजना राबविण्याची

विधानसभा असुधारित प्रत

सुचना केलेली असणे, यामध्ये काही सामाजिक संस्थांचा सहभाग करुन घेण्याविषयीही सुचित केलेले असणे, मेळघाटमधील आदिवासींच्या मुलभूत प्रश्नांविषयी शासनाने करावयाच्या उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

## ( दुपारी १२.०० वाजता )

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(अ)** बुधवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील मा. अध्यक्षांच्या निदेशानुसार राखून ठेवण्यात आलेला श्री. कुणाल पाटील, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४४७८५ "**राज्यातील आदिवासी जिल्ह्यातील बालक आणि माता यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी नवसंजीवनी योजना सुरू करण्याबाबत**".

**(ब)** तारांकित प्रश्न

**दोन : अभिनंदनपर प्रस्ताव –**

मार्गारिटा रूडोमिनो ऑल रशिया स्टेट लायब्ररी फॉर फॉरेन लिटरेचर मॉस्को, रशिया यांनी साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा अर्धाकृती पुतळा संस्थेच्या प्रांगणात बसविल्याबद्दल या संस्थेचे अभिनंदन करण्याबाबतचा प्रस्ताव.

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : महाराष्ट्र राज्य माहिती आयोग यांचा दिनांक १ जानेवारी, २०१९ ते ३१ डिसेंबर, २०१९ या कालावधीतील चौदावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : **(क)** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा "सन २०२०-२०२१ या वर्षाचा राज्य वित्तव्यवस्थेवरील लेखापरीक्षा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा

विधानसभा असुधारित प्रत

"महाराष्ट्रात चौऱ्याहत्तरावी संविधान सुधारणा अधिनियमाच्या अंमलबजावणीची परिणामकारकता यावरील अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** शासनाच्या गृह विभाग, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग व उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग या विभागांतर्गत संस्थांनी दिनांक १ एप्रिल, २०२१ ते ३१ मार्च, २०२२ या कालावधीत घेतलेले कर्ज व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमी विषयीचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१७-१८ व सन २०१८-१९ या वर्षांचा स्वतंत्र लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा सन २०२०-२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन २०१९-२० या वर्षाचा पंधरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(छ)** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचा सन २०१२-२०१३, सन २०१३-२०१४, सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ज)** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(झ)** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

विधानसभा अग्रिम प्रत

**(त्र)** शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षांचा अनुक्रमे सतरावा व अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उच्च व तंत्रशिक्षण आणि वस्त्रोद्योग मंत्री** :

**(क)** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०२०-२१ या वर्षाचा वार्षिक लेखे अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०१९-२० व सन २०२०-२१ या वर्षांचे लेखा परिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, मुंबई यांचा सन २०१५-२०१६ ते सन २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांचा दिनांक १ एप्रिल, २०१५ ते ३१ मार्च, २०१६, १ एप्रिल, २०१६ ते ३१ मार्च, २०१७, १ एप्रिल, २०१७ ते ३१ मार्च, २०१८ व १ एप्रिल, २०१८ ते ३१ मार्च, २०१९ या कालावधीचे लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि संविधानिक लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा त्रेपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) बंदरे आणि खनिकर्म मंत्री** :

**(क)** महाराष्ट्र सागरी मंडळ यांचे सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचे

विधानसभा अग्रिम प्रत

प्रशासकीय अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र सागरी मंडळ यांचा सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षांचा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(५) रोजगार हमी योजना मंत्री** : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(६) उद्योग मंत्री** : **(क)** राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ या वर्षांचा अनुक्रमे छप्पन्नावा व सत्तावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**चार : वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचा आठवा, नववा व दहावा एकत्रित अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**पाच : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**सहा : औचित्याचे मुद्दे.**

**सात : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ — महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, २०२२.

विधानसभा असुधारित प्रत

**(२)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ – महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती विधेयक, २०२२.

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ – महाराष्ट्र अधिसंख्य पदांची निर्मिती व निवड केलेल्या उमेदवारांची नियुक्ती विधेयक, २०२२.

**(२)** सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ – महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते आणि महाराष्ट्र विधानमंडळातील विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, २०२२.

**आठ : मा.मुख्यमंत्री यांचा म.वि.स नियम ११० अन्वये शासकीय ठराव :-**

**ज्याअथी,** नागरी विमानचालन महासंचालक, नागरी विमानचालन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी कार्यालयीन ज्ञापन क्रमांक. ए व्ही. २४०११/१/९५- व्ही बी (खंड सहा), दिनांक ६ जुलै, २००७ व्दारे नवी मुंबई, महाराष्ट्र येथे सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून (पीपीपी) नवीन (ग्रीनफिल्ड) विमानतळ उभारण्यास 'तत्त्वतः मान्यता दिली आहे;

**आणि ज्याअर्थी,** नवी मुंबई येथील उक्त विमानतळाला "लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई विमानतळ" असे नाव देणे इष्ट आहे आणि त्या प्रयोजनार्थ, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यानंतर, असा प्रस्ताव, भारत सरकारच्या नागरी विमानचालन मंत्रालयाकडे पाठवणे आवश्यक आहे;

**त्याअर्थी आता,** महाराष्ट्र विधानसभा नियमांच्या नियम ११० नुसार, महाराष्ट्र विधानसभा याव्दारे, नवी मुंबई येथील उक्त विमानतळाला "लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई विमानतळ" असे नाव देण्याची शिफारस भारत सरकारला करते.

**नऊ : मा. उद्योग मंत्र्यांचा म.वि.स. नियम ११० अन्वये शासकीय ठराव :-**

**ज्याअर्थी,** भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "भूमिसंपादन अधिनियम" असा केला आहे) महाराष्ट्र राज्याला लागू असताना, त्याच्या कलम १०५क च्या पोट-कलम (२) मध्ये अशी तरतूद आहे की, राज्य शासनास, राज्य

विधानसभा अप्रकाशित प्रत

विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी ठराव संमत केल्यानंतर, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, असा निदेश देता येईल की, पहिल्या अनुसूचीनुसार नुकसानभरपाईचे निर्धारण करण्याशी संबंधित असणाऱ्या भूमिसंपादन अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ३) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मऔवि अधिनियम" असा केला आहे) याचा समावेश असलेल्या, पाचव्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमितींखालील भूमी संपादन करण्याच्या प्रकरणांना लागू होतील, किंवा यथास्थिति, ज्यामुळे नुकसानभरपाई कमी होणार नाही किंवा नुकसानभरपाई, पुनर्वसन व पुनर्वसाहत यांच्याशी संबंधित असलेल्या भूमिसंपादन अधिनियमाच्या तरतुदींचे सौम्यीकरण होणार नाही अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अपवादांसह किंवा फेरबदलांसह लागू होतील;

**आणि ज्याअर्थी,** अशी अधिसूचना काढल्यावर, उक्त कलम १०५क च्या पोट-कलम (१) च्या तरतुदींनुसार, भूमिसंपादन अधिनियमाच्या तरतुदी, पाचव्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमितींखालील भूमी संपादन करण्यासाठी लागू असणार नाही;

**आणि ज्याअर्थी,** सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ व्दारे सुधारणा करण्यात आलेल्या, मऔवि अधिनियमामध्ये अशी तरतूद आहे की, जिल्हाधिकाऱ्यास, नुकसानभरपाईची रक्कम निर्धारित करताना, भूमिसंपादन अधिनियमाच्या कलम २६ ते ३० यामध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदी आणि इतर संबंधित तरतुदी, त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या फेरबदलांस अधीन राहून, मार्गदर्शक राहतील;

**आणि ज्याअर्थी,** मऔवि अधिनियमाच्या तरतुदींनुसार प्रदेय असलेल्या नुकसान भरपाईशिवाय, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने, त्याच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१९ च्या परिपत्रकाव्दारे, सर्वसमावेशक पुनर्वसन धोरण, २०१९ तयार केले आहे;

**आणि ज्याअर्थी,** नुकसानभरपाई व पुनर्वसना संबंधीच्या मऔवि अधिनियमाच्या आणि तयार केलेल्या उक्त धोरणाच्या तरतुदी, भूमिसंपादन अधिनियमाच्या नुकसानभरपाईच्या व पुनर्वसनाच्या तरतुदींपेक्षा अधिक लाभदायक आहेत;

**त्याअर्थी आता,** भूमिसंपादन अधिनियमाच्या कलम १०५क च्या पोट-कलम (२) चे परंतुक आणि महाराष्ट्र विधानसभा नियमांचे नियम ११० यांनुसार, महाराष्ट्र विधानसभा असा ठराव करते की, भूमिसंपादन अधिनियमाच्या कलम १०५क च्या पोट-कलम (२) च्या प्रयोजनार्थ, अधिसूचना काढण्यात यावी.

**(बुधवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव)**

**दहा : अंतिम आठवडा प्रस्ताव :**

**सर्वश्री अजित पवार, बाळासाहेब थोरात, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, पृथ्वीराज चव्हाण, अशोकराव चव्हाण, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, विजय वडेट्टीवार, अजय चौधरी, धनंजय मुंडे, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री राजेश टोपे, सुनिल प्रभू, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री हसन मुश्रीफ, अमित देशमुख, डॉ. राजेंद्र शिंगणे, ॲड के.सी.पाडवी, सर्वश्री भास्कर जाधव, बाळासाहेब पाटील, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री सुनिल केदार, संजय बनसोडे, सुरेश वरपुडकर, अनिल पाटील, रईस शेख, प्रकाश सोळंके, मनोहर चंद्रिकापुरे, धर्मरावबाबा आत्राम, दौलत दरोडा, दत्तात्रय भरणे, सर्वश्रीमती सुलभा खोडके, प्रतिभा धानोरकर, कु. आदिती तटकरे, डॉ. विश्वजीत कदम, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री रणजित कांबळे, दिलीपराव बनकर, संजयमामा शिंदे, राजु कारेमोरे, शेखर निकम, सुनिल भुसारा, नितीन पवार, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री रोहीत पवार, राजन साळवी, चंद्रकांत नवघरे, कैलास गोरंटयाल, विकास ठाकरे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री धीरज देशमुख, वैभव नाईक, अमित झनक, कुणाल पाटील, कैलास घाडगे-पाटील, प्रकाश फातर्पेकर, राजू आवळे, जितेश अंतापूरकर, नितीन देशमुख, उदयसिंग राजपूत, सुभाष धोटे, शिरीषदादा चौधरी, पी.एन. पाटील-सडोलीकर, रमेश कोरगांवकर, सहसराम कोरोटे, मानसिंग नाईक, अतुल बेनके, दिपक चव्हाण, श्री. अमिन पटेल, ॲड अशोक पवार, सर्वश्री. अस्लम शेख, आशुतोष काळे, इंद्रनिल नाईक, ऋतुराज पाटील, डॉ किरण लहामटे, श्री चेतन तुपे, श्रीमती जयश्री जाधव, सर्वश्री झीशान सिद्दीकी, दिलीप मोहिते-पाटील, प्राजक्त तनपुरे, बबनराव शिंदे, बाबासाहेब पाटील, बाळासाहेब आजबे, मकरंद जाधव-पाटील, ॲड माणिकराव कोकाटे, सर्वश्री यशवंत माने, रविंद्र वायकर, राजेश पाटील, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री संग्राम थोपटे, संग्राम जगताप, संजय जगताप, संदिप क्षिरसागर, सुनिल राऊत, सुनिल शेळके, सुनिल टिंगरे, श्रीमती सुमन पाटील, सर्वश्री हिरामण खोसकर, अण्णा बनसोडे, बळवंत वानखेडे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्याची ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, हत्या, घरफोड्या, जुगार व अपहरणाच्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, ज्येष्ठ नागरिकांच्या फसवणुकीच्या गुन्ह्यात झालेली वाढ, गुटख्याची तस्करी, वाहतूक, साठवण व विक्री जोमात सुरु असणे, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, पोलिसांच्या बेदरकार वृत्तीमुळे गोंदिया जिल्ह्यात एका महिलेवर नराधमांनी वारंवार केलेला अत्याचार, पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील कोथूर्णे गावातील अल्पवयीन मुलीवर अमानुष अत्याचार

करुन मृतदेह झुडपात फेकून दिलेला असणे, संपूर्ण देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत असताना औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर सहा नराधमांनी अत्याचार केल्याची घटना उघडकीस आलेली असणे, अशाचप्रकारच्या घटना बीड, मावळ, मुंबई व अन्य ठिकाणी एकामागोमाग एक घडल्यामुळे महिला, मुली यांच्यात पसरलेले भीतीचे व चिडीचे वातावरण, त्यातच ठाणे येथे महिला पोलीस कर्मचाऱ्याने केलेली आत्महत्या, डान्सबारला आळा घालण्यात आलेले अपयश, खुद्द मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यातील निवासस्थानापासून हाकेच्या अंतरावर कोपरी, कापुरबावडी व इतर परिसरात डान्सबार सुरु असल्याची बाब माध्यमांनी उघडकीस आणलेली असणे, सायबर गुन्हेगारांनी अनेकांना घातलेला गंडा, मुंबईतील खार येथे दिवसाढवळ्या गोळीबार करुन दहशत निर्माण करण्याचा केलेला प्रयत्न, गुंड टोळ्यांनी उचल खाल्ल्याने निर्माण झालेले दहशतीचे वातावरण, सत्ताबदल झाल्यानंतर सत्तारुढ पक्षाच्या लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांकडून शासकीय अधिकारी यांना करण्यात आलेली मारहाण तसेच चिथावणीखोर वक्तव्यांमुळे कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची निर्माण झालेली शक्यता, सरकारपुरस्कृत गुंडाराजचं होत असलेलं उदात्तीकरण, कोथरुड, पुणे येथे कामगाराला वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडून लाथाबुक्क्याने करण्यात आलेली अमानुष मारहाण, भ्रष्टाचार, खंडणी व अन्य अनियमिततांसाठी निलंबित करण्यात आलेल्या काही वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना चौकशी पूर्णत्वास जाण्याअगोदरच सेवेत घेतल्याने प्रामाणिक अधिकाऱ्यांचे झालेले खच्चीकरण तसेच भ्रष्ट अधिकाऱ्यांचे वाढलेले मनोबल, मागील काळात सामाजिक तेढ निर्माण करण्याच्या घटना घडल्या असून त्यास कारणीभूत असलेल्यांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता असणे, मुंबई व आसपासच्या परिसरात अंमली पदार्थांचा झालेला सुळसुळाट, रेल्वे हद्दीतील गुन्हेगारीत झालेली प्रचंड वाढ, आमदारांना मंत्री पद देण्याचे अमिष दाखवून दलालांमार्फत आर्थिक गैरव्यवहार केल्याची बाब उघडकीस आली असून लोकप्रतिनिधींभोवती संशयाचे वातावरण निर्माण झाले असल्यामुळे एसआयटी नेमून तपास करण्याची आवश्यकता असणे, पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांच्या प्रश्नासंदर्भात घेण्यात आलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होत नसणे, मुंबई व उपनगरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रकल्प दोन वर्षांपासून रेंगाळलेला असणे, तसेच, मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकासाच्या योजना, सेसच्या इमारतींच्या पुनर्विकास योजना आणि अन्य पुनर्विकास अनेक वर्षांपासून विविध कारणांमुळे अर्धवट स्थितीत रखडलेला असून विस्थापित झालेल्या रहिवाश्यांना विकासकांकडून घरभाडे देखील अदा केले जात नसणे, झोपडपट्टी पुनर्विकास करताना एक अधिक एक मजला असल्यास पहिल्या मजल्यावरील रहिवासी मालमत्ता कर, लाईट बिल भरत असल्यामुळे त्यांनाही पात्र समजून लाभ देण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता असणे, मुंबई व राज्यातील इतर अनेक भागात, विशेषत: ठाण्याच्या प्रवेश मार्गात खड्डेमय रस्त्यामुळे वाहतुक खोळंबून सर्वसामान्यांना होणारा प्रचंड त्रास, मुंबईच्या पश्चिम व पूर्व द्रुतगती महामार्गावर सकाळी व सायंकाळी होणारी वाहतूक कोंडी, अपघातांचे वाढलेले प्रमाण, नगरपालिका व महानगरपालिका प्रभाग रचना बदल करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे यंत्रणेवर पडलेला प्रचंड बोजा, खर्चात झालेली वाढ व राजकीय कारणासाठी निर्णय घेतला असल्याबाबत जनतेच्या मनात शंका निर्माण झाली असणे, अनावश्यक बुलेट

विधानसभा अमुद्रित प्रत

ट्रेनकरिता मुंबई व आसपासच्या कोट्यवधी रुपयांच्या जागा कवडीमोल भावाने दिल्या जाणे आणि शासकीय तिजोरीवर नाहक सहा हजार कोटी रुपयांचा बोजा पडला असणे, पर्यावरण तज्ज्ञ व पर्यावरणप्रेमींचा ठाम विरोध असतानाही आरे येथे कारशेड उभारण्याकरिता पुन्हा बेकायदेशीररित्या झाडे तोडण्याचे काम सुरु केलेले असणे, तसेच राज्यात कोविड विषाणू प्रादुर्भाव पुन्हा जोर धरु लागला असणे आणि मंकी पॉक्स, झिका व्हायरस, लेप्टो व मलेरीया, हत्तीरोग, स्वाईन फ्ल्युच्या आजारांनी थैमान घातले असताना प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात सरकारला अपयश आलेले असणे, पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील एका आदिवासी गर्भवती महिलेला आरोग्य व दळणवळणाच्या सुविधा वेळेत न मिळाल्याने नवजात जुळ्या मुलांचा डोळ्यादेखत झालेला दुर्देवी मृत्यू, राज्यात ४६ दिवस विभागाला मंत्री नसल्यामुळे एकंदरीत सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा उडालेला बोजवारा, तसेच राज्यात शालेय शिक्षण विभागामार्फत शिक्षकांच्या टीईटी परीक्षेत, निवड व भरती प्रक्रियेत सनदी अधिकारी, संचालक, संस्था चालक व त्यांचे पदाधिकारी यांचे आर्थिक हितसंबंध असल्याची गंभीर बाब निदर्शनास आलेली असणे, लोकप्रतिनिधींच्या मुला-मुलींच्या नावाचा समावेश असल्याचेही उघड झालेले असताना सदर लोकप्रतिनिधीला मंत्रिमंडळात स्थान दिल्यामुळे राज्यात तीव्र असंतोष पसरला असणे, तसेच पेट्रोल व डिझेलची केलेली प्रचंड वाढ आणि केंद्र व राज्यसरकारच्या चुकीच्या धोरणामुळे, प्रचंड प्रमाणात वाढलेली महागाई, परिणामी हातावर पोट असणाऱ्या, गरीब, सामान्य नागरिकांना दैनंदिन जीवन जगणे मुश्किल झाले असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**अकरा : "भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या विषयावर चर्चा.**

**बारा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या बॅलटद्वारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना)**

**(१) श्री. राजन साळवी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"रत्नागिरी जिल्हयातील सहयाद्रिच्या पायथ्याशी व दऱ्याखोऱ्यात वसलेल्या धनगरवाडया आजतागायत मुलभूत सोयी-सुविधांपासून वंचित असणे, सदरहू धनगरवाडयांना मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ डिसेंबर, २०२१ रोजी मा. राज्यमंत्री सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे पत्रव्यवहार करुन वसंतराव नाईक तांडावस्तीची सातत्याने मागणी करणे, लोकप्रतिनिधिंच्या पत्राच्या अनुषंगाने धनगरवाडयांना मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्याकरिता वसंतराव नाईक

विधानसभा असुधारित प्रत

तांडावस्ती सुधार योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने प्राधान्याने लक्ष घालून तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता."

**(२) श्री. कुणाल पाटील, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीबर चर्चा उपस्थित करतील.**

"धुळे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २६ शाळांच्या एकूण ६१ वर्ग खोल्या मोडकळीस आलेल्या असणे, तसेच ५ ते ६ शाळांची इमारत खिळखिळी झालेली असणे, मोडकळीस आलेल्या इमारती व वर्ग खोल्या पाडून त्या जागी नव्याने बांधकाम करण्याची आवश्यकता, त्यासाठी धुळे जिल्हा परिषदेने फेब्रुवारी, २०२२ मध्ये शासनास वर्ग खोल्या निर्लेखनाच्या प्रस्ताव दिलेला असून ५ महिन्यांचा कालावधी उलटूनही या प्रस्तावाला शासनाची मान्यता मिळालेली नसणे, तरी सदर प्रस्तावास तातडीने मान्यता देऊन त्यासाठी लागणारा निधी तातडीने मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**तेरा : अशासकीय विधेयके :-**

**पुर:स्थापनार्थ :**

(१) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३० - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२१ – **श्री.संजय सावकारे, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३२ - महाराष्ट्र राज्यातील बेरोजगार युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक, २०२१ - **श्री. प्रकाश आबिटकर, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३४ - महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष (सुधारणा) विधेयक, २०२१ - **श्री. सुहास (आण्णा) कांदे, वि.स.स. यांचे.**

विधानसभा अस्सुधारित प्रत

(४) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२२ - **श्री.संजय सावकारे, वि.स.स. यांचे.**

(५) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०२२ - **ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे.**

(६) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२२ – **श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचे.**

(७) सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२२ - **ॲड. राहुल कुल, वि.स.स. यांचे.**

**चौदा : अशासकीय ठराव (म.वि.स. नियम १०६ अन्वये) :-**

**दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी बॅलटव्दारे काढण्यात आलेल्या अशासकीय ठरावाच्या सूचना (क्रमांक १ ते ३)**

(१) **श्री. प्रताप अडसड, वि.स.स. यांचा ठराव क्र. १३३**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्य लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **श्री. चेतन तुपे, वि.स.स. यांचा ठराव क्र. १७**

"राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि इतर महानगरपालिकामधील लोकसंख्येत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठया वसाहती, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरांमधील कचरा टाकताना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात

विधानसभा असुधारित प्रत

कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा होणारा तीव्र विरोध, या बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांचा ठराव क्र. ५९**

"राज्यात राष्ट्रीय व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्गावर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु करणे, सदरची उपचार केंद्रे सुरु झाल्यास तेथे वैदयकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी यांची नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळणे, राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होणे, तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार मिळणे, यासाठी राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर प्रत्येक ५० कि.मी. अंतरावर एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

## " राष्ट्रगीत "

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २४ ऑगस्ट, २०२२

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

विधानसभा असुधारित प्रत